# कादोडी

नाताळ २५ डिसेंबर २०२३

बारावा वहरी  एकून १९ वॉ अंक

( खाजगी वितरण)



Design : Paul Dmello

# कादोडी

## नाताळश्या हनाओ विशेषांक

२५ डिसेंबर २०२३

बारावा वहरी
एकोनिसावॉ अंक

खाजगी वितरन

## या अंकात .......


संपादकीय

माआ पीएशडीशी (PHD) कानी - डॉ. नेहा सावंत

ओळख - सॅबी परेरा

हयरा जकला – फ्रान्सिस डिमेलो

हेळ्यो गोष्टी – पॅट्रिक कोरिया

तू मिळालोस्ती तॅ – कॅरल डिकोस्टा

आमंत्रण ! - सिरील मिनेझीस

सरीखाल - प्रेम आल्मेडा

वसयसॉ कुपारी - बॅप्टिस्ट वाझ

“फाटला नाय ता तांबडा.... - हेडविजेस रुमाव


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.


**प्रमुख संपादक**
ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**कार्यकारी संपादक**
एडवर्ड डिसोजा

**सहसंपादक**
सुनील बा. डिमेलो

**संपादक मंडळ**
सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो, सिरील मिनेझीस

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :- www.kadodi.in**


या अंकात प्रसिद्ध जालॅल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

**सूचना:-** ‘कादोडी’ या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.


MERRY
Christmas
HAPPY NEW YEAR
Wishing you a season that's merry and bright with the light of God's love.
BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD.1918
(SCHEDULED BANK)
Board Of Directors
Benauld Dias
Chairman
Simon Soares
Vice-chairman
Sandeep Seth
CEO
Roshan Pereira
General Manager
Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy, Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra.
Toll Free Number : 080 6942 0000 | www.bccb.co.in

# संपादकीय

सब्बान कुपारी बाहा-बेनींना नाताळश्या  हनायो आन नव्या वहारायो ओबड्यो शुभेच्छा.

मंडळी,  एप्रिल २०१२ ला ईस्टरश्या दिहा आपलॉ अयलॉ-पयलॉ ‘कादोडी’ अंक प्रकाशित जालतॉ. यंदा बारावा वहरी सुरु जालॅ, मिनॅस आमाला वाटला की लेख-कविता कय आला नाय तॅ अंक काड्यासॉ बंद कऱ्या लागॅदॅ गा का? पान नाय... २०१२ पासून आपल्या समाजात या अंकामुळॅ एक जही नवीन क्रांती घडली, कारन यॉ अंक प्रकाशित झाल्योर त्या वहरापासुन “बारा आने बाटली जाम काम” या आपल्या बोलीभाषेतश्या आजवरश्या पयल्या नाटकाव ३५ वहरानंतर परत एकदा प्रयोग झालॉ. “कुपारी संस्कृती मंडळ” स्थापन झाला, त्याद्वारे ओडे वहरे जाले, “कुपारी महोत्सव” साजरॉ हॉतॅ. “हाऊ ओऊसा तळा” या नवीन नाटका खेळाला सुरुवात जाली. आपल्या पोरांबरबर मराठी बोलनारॅ लोक त्याहरी आपल्या भाशॅत बॉल्या लागलॅ. आपली तरुन पिढी जी आपलॉ पारंपारिक पोशाख जवळजवळ बाहालतॅ (विहारलोतॅ) ते वॅगवॅगळ्या कार्यक्रमानिमितान घाल्या लागले. आपल्या भाशॅत पुस्तके प्रकाशित जाले.

आन त्यावर कळस मंजॅ आपल्या भाशेश्या लिखानावर डॉ. नेहा सावंत याई अब्यास कॅलॉ आन त्यांश्या परबंदाला यंदा पीएचडी मिळाली, यी आपल्या समाजाकरता खुब भोठी गोष्ट हाय, त्यांना विनंती केलती की तुमॅ तुमसॉ यॉ सब्बान परवास आपल्या अंकाकरता लिऑन द्या, मराठीमिने द्या आन आमॅ आपल्या भाशेत कर्त्याव. त्याई मस्तपैकी आपल्या ‘कादोडी’मिनॅ लीवॉन दिलॉ, आमाला जास्ती मेहनत कऱ्या लागली नाय. तुमॅ तॉ वासास. नेहाबायसा खुब खुब अभिनंदन.

मंडळी, कायिक गोष्टीओर आपुन ध्यान द्या पाय आहा आमाला वाटातॅ, आपले पोरे खुब बऱ्यापैकी बार जा लागल्यात, आपलॅ पाऊनकोटी, कोटीये बंगले ओस पड्या लागल्यात, कायिक घरात फक्त वयस्कर माहनॅ हात... आपल्या अडश्या लगनामिनॅ हॉनारी सयपाकाइ नासाडी, प्री-वेडिंग रिसप्शनमुळॅ चुकनारॉ अंदाज, त्यामुळॅ हॉनारॉ पैशाऑ नास. सामाजिक कामाकरता नातॅ कुहना आंदोलन कऱ्या करता आपला आतॅ मागॅ पडनारा पाऊल, आन त्यामुळॅ आपल्या समाजातनॅ समाजाला पुडॅ घॅवॉन जायदॅ आहा राजकीय नेतृत्व न हॉना.. या गोष्टीओर आपुन जरा कडाक नंदार टाक्या पाय. बाकी आपलॉ कुपारी समाज कुहन्यास गोष्टीत मागॅ नाय, आपल्या समाजानॅ खुब प्रगती केले, कला-क्रीडा आन अहयास अनेक क्षेत्रामिनॅ खुब ऊंची गाठीले, खाजगी कंपन्यामिनॅ भॉट्या पदोर आपले तरून पोसल्यात. बिझनेसमिनॅ पन खुब जनाई भोटी मजल मारले. आपल्या समाजायी अहीस प्रगती हॉत रेवो आन आपली संस्कृती टिकॉन रेवो...

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

## *कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी*

आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा

*१३ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**जीवन विकास दिर्घ मुदत ठेव योजना** ७.६० % (सरळव्याज)

**ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर** - द.सा.द.शे. **७.५५%** व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.३० % व्याजदर**

**८.५०% ते ११.७५%** व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

## शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८.९५%

**(उच्च शैक्षणिक खर्चाच्या १००% शैक्षणिक कर्ज देणारी एकमेव पतसंस्था)**

## घरबांधणी कर्ज द.सा.द.शे. ९% व्याजदर

## फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ८.५०% व्याजदर

**शॉप, गाळे, मशिनरी खरेदीसाठी द.सा.द.शे. ९.५०% व्याजदर**

**(१ कोटीपर्यंत कर्ज वितरण करणारी एकमेव पतसंस्था)**

## रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण

**नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट**

**३० नोव्हेंबर २०२३ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* भागभांडवल रू. १३.६१ कोटी
* कर्जे रू. २०१.६६ कोटी
* ठेवी रू. ३३४.०२ कोटी
* गुंतवणूक रू. २१०.८४ कोटी
* एकूण व्यवसाय रू. ५३५.६८ कोटी
* सभासद संख्या १६९०२
* निव्वळ एन. पी. ए. ०%

* दि. ३१/०३/२०२३ अखेर नफा रू. ६.४२ कोटी

**शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) |
|---|---|---|---|---|---|
| फोन :८००७९५५४३० | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ | मो. ७८७५८९५५०८ |

**लता जे.फोस**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**संज्याव जे.रोझारियो**
उपाध्यक्ष

**नेल्सन पी. दोडती**
अध्यक्ष

व संचालक मंडळ

# माआ पीएशडीशी (PHD) कानी - डॉ. नेहा सावंत, मुंबई

तॉ दि आजपन माला बरोब्बर आठवातॅ. २०१२ ला भुईगावशा युवक वाचनालय आन 'व' अंक याई वसयशा वर्तक शाळीत 'साहित्य संप्रेषण' नावासा एक दिहासा साहित्य संमेलन ठविलता. तडे माव जुनॉ मित्र आन मास हॅजाळसॉ कवी वर्जेस सोलंकी यानॅ माला तडॅ यासा वारना कॅलता. ऑडास नाय तॅ कारिक्रमाआ निवेदन करॅशी आख्खी जबाबदारी मा आंगोर टाकीलती. मॅ पन ती हारकी निबाविली. तडे वर्जेसनॅ माई ओळोख ख्रिस्तोफर रिबेलो आन एडवर्ड डिसोझा याहरी करॉन दिली. वर्जेसनॅ हांगीला गा ये 'कादोडी' नावासॉ तॅआ बाशेसॉ अंक काडत्यात. 'कादोडी' अही कुहनी बाशा हाय, ई मॅ पयलँदास आयकातोती. माआ मनात बेताम प्रश्न उबी रॅलॅ. कारिकरमा दरम्यान पानी पॅआ करता मॅ बार आली. तडॅ ये दोगी कयतरी बॉलात ऊबी हॉतॅ. माला इ बाशा आयकॅदो वायलीस वाटली. कोडी फास. मंग सदारन २०-२५ मिंटे मॅ या दॉगांना मा मनातशॅ प्रश्न विसरोन माइती घेट्ली. ख्रिस्तोफर आन एडवर्डनॅ बऱ्यापैकी माइती दिलीस पन या बाश्योर अद्याप कुनॅ कैस काम कॅला नाय ई आयकील्योर आपुन योर काम करेसा आहा तडश्या तडे मनात ठरविला. पन जा आपुन ठरवीतॅव त्योर हाथालागली थोडीस काम करतॅव.... मा पन ताहास जाला.

तॅआ नंतरश्या दोन-तीन वहरात ख्रिस्तोफरशी तीनशारदा भॅट जाली, आन दरपाळी तॉ माला आठोन करॉन दॅसॉ. मंग मात्र मॅ मनोर घॅटला आन कामाला सुरवात केली. खरामिंजॅ तहॉ उहुरुस जाल्तॉ. तॉँड वर करॉन मे बॉलॉन बेहल्ती गा या बाश्योर मॅ संशोदन करनार. पन ॲखाद्या बाश्योर संशोदन करॅसा मिंजॅ परयोगशाळीत जाऑन कापाकापी करॉन तॅआ विश्लेशन करन्याहारका नॉता. भले मॅ मराठी शी मास्तरीन अहली तरी ॲखाद्या बाशेआ संशोदन कऱ्या करतान का का करॅ लागातॅ ई कय गाई नॉता. कादोडी बाशेलास कुपारी आन सामवेदी बाशा बॉलातॅत ई पन माइत नॉता. ई बाशा कही हाय, लिवीतॅत कही ई कइस गाई नॉता. ख्रिस्तोफरनॅ दिलॅलॉ एकुस 'कादोडी'सॉ अंक मा पा हॉतॉ. पयलॉ मॅ तॉ वाशिलॉ. सब्द बेतान वायलॅस हॉतॅ. खूपशॅ सब्द मॅ पयलँदास वाशिलॅ. तॅतशी 'जक्ल्या कुपारी बांदवांना नाताळ हनायो ओब्ड्यो सुबेच्छा.' ई पयली ओळ वाशिली, आन मंग माला हुमजाला गा जक्ल्या मिंजॅ सगळ्या आन हन मिंजॅ सण. मंग आख्खॉ कादोडी अंक वाश्या जाम मजा आली. अस्तॅअस्तॅ माला एकेक सब्द हुमजॅदो लागलॉ. या अंकामीनॅ जक्ल्या लेखकांशॅ नंबर दिलतॅ त्योरनॅ मॅ जकल्यात पयलॉ फोन सायमन रॉड्रिग्ज आन सिरील मिनेझिस यांना कॅलॉ. तॅआ दॉगांना जाऑन भेटली. तॅआ दॉगां घारा मा आ बऱ्यापैकी

स्वागत जाला. सिरीलनॅ तॅ तॅआ दरसा जक्ला लिखान माला दॅऑन टाकीला. सायमन रॉड्रिग्ज तॅ जवळूस रॅतोतो तॅ तॅआ घारा जाऑन मा मनात अहलॅल्या जक्ल्या प्रश्नाये मॅ उत्तरे घॅऑन आली. मनात हुरूप आलॉ. आंगात बळ आला. मंग मॅ मा आ संशोदनाइ सौकट मनात तयार करॉन तॅऑ आराखडॉ तयार कॅलॉ.

२०१७ मीनॅ मॅ माव संशोदना ऑ आराखडॉ मराठी विभागात दिलॉ. तॉ देतानास तडे माई मुलाखत पन घेट्ली. तिगाळा तडे बेतान शरशा जाली. तवपोत डॉ. नरेश नाईक याई, ‘सामवेदी भाषेचा संरचनात्मक अभ्यास’ या विशयोर संशोदन करॉन डॉक्टरेट मिळविल्ति. ऑडास नाय तॅ तॅंना तॅंआ संशोदनाकरता अ. का. प्रियोळकर पुरस्कार पन मिळाल्तॉ. आतॅ नियमापरमानॅ माला तॅआस विशयोर संशोदन करता अॅनार नॉता. आन ताहा पन माला सामवेदी बाशेत लिवलॅल्या साहित्य आन तॅतशा समाजाऑ-संस्कृतीऑ अभ्यास करॅसॉ हॉतॉ. माआ बॉलना आयकॉन समितिनॅ, संशोदनाला मॅ दिलॅला नाव बदल्या लागेदे आहा हांगीला. तॅआ मुलाखती वक्ताला माव जीव घाबारलॉतॉ. आपुन कॉड्या पान्यात हाव इ जान्वाला. कॉडा बॉठ्ठा आबाळ गाठॅसा हाय आन कॉडॉ दऱ्यो उपॅसॉ हाय इ जान्वाला. इ काम वरवरनॅ दिखातॅ तॉडा सॉप्पा नाय इ कळॉन सुक्ला. मॅ मा आ संशोदनाव विशय सामवेदी समाज आन सामवेदी बोली पुरता न ठविता सामवेदी ख्रिस्ती समाज मिंजॅस कुपारी समाज आन तॅआ समाजासा लिखित-अलिखित साहित्यासा सामाजिक, सांस्कृतिक आन वाङ्गमईन आंगानॅ अभ्यास अहॉ कॅलॉ. मुंबय विद्यापीठातश्या प्रमुखानॅ माला हांगीला गा ‘नुस्ते पास-स अंक, पन्नास लोकगीते आन दोनशे म्हनीनॅ ऑ अभ्यास हॉनार नाय. आन नुस्ता संख्यात्मक नाय तर तॅआ साहित्याव दर्ज्यो पन तपाशीलॉ पाय. ‘तुमाला निदान शंबर कविता, पन्नास कान्यो, एकांकिका-नाटक अहे सब्बान परकार मिळविलॅ पात, अभ्याशिलॅ पात.’ इ आहा आयकिता खोटी मा नंदऱ्यापुडॅ तारॅ आलॅ. इ ऑडा साहित्य काहा आन कडने हाडॅसा. माला कय सुशेसास रॅला.

मा आब्यासाला सुरवात पन जाल नोती आन एक दि माला फोन आलॉ, ‘मॅ रोशल बॉलातॅ, तुमे आमशा कादोडी बाश्योर पीएचडी करत्या ना मंग माला अही अही माइती पाय ती हांगा ना.’ आतॅ जाली गनाय पंशायत..! अजून माआ कामाला सुरवात पन जाल नोती आन मॅ संशोदन करतॅ इ बातमी वाऱ्याहारकी वसयमीनॅ पसारलोती. माला वाटला इ पोरी माई परीक्षा घ्या लागले. माला थॉडाफार जा का माइती हॉता ता मॅ तिला हांगीला. माआ बोलन्योरनॅ तीआ समादान जाला बवतेक. ‘माला तुमाला भॅटॅसा हाय’ आहा ती बोयली. मंग आमी वसयलास भेटले. तिगाळा ती मादो एक २०१२सॉ पाशीहार अंक घिती आल्ति. तॅतसा बरास लिखान मा कामाआ हॉता. त्योर संपादक जिम रॉड्रिग्ज आन बी मंडळीशॅ

नंबर हॉतॅ. आदी त्याहरी बॉलॉन मंग भॅट आहा मा काम सुरू जाला. जिमनॅ २०१२ पासूनशॅ जक्लॅ अंक दिलॅ. आन मंग मॅ नव्या हुरूपानॅ कामाला लागली. आतॅ मापा कादोडी आन पाशीहार शॅ खुब अंक जमा जाल्तॅ पन माला जॉडा पावता तॉडा साहित्य तॅत नॉता. माला अजून शोद घॅना भाग हॉता.

कादोडी आन पाशीहार या अंकामिनॅ अहलॅल्या जकल्या माहनाइ माला खुब मदत केली. मॅ सरळ तॅँआ घारास जाशी. परतेका घारा ऑबडा पिरेम मिळॅसा. दरपाळी माला नवीन लेखक-कवी नाव आन पत्तॉ मिळॅसॉ. यातनॅस बर्नादेत रुमाव, सॅबी परेरा, सिमसन रॉड्रिग्ज, एमेल आल्मेडा, फ्रान्सिस डिमेलो, सबिना फोस, फ्रॅंक मिरांडा अहया खुपश्या लॉकाइ ओळोख जाली. कुन कविता लिवॅसा, कुन कानी तॅ कुन लेख. जाम भारी वाटॅ लाग्लोता. परतेक जन दुहऱ्या नाव सुसवीतोता. कुनॅतरी हांगीला, ‘तुमे बबन गुरुजीला भेटल्या गा ? तॅइ कादोडी मिनॅ पयला नाटक लीविलता. मंग आमसा गाडा तडॅ वळॅसा. कुनॅ हांगीला आगायसॉ सिरील मिनेझिस ऑ पयलॉ कुपारी लेखक जॅये कादोडीतशे पुस्तके प्रकाशित जाल्यात. सिरील दरनॅ माला ९ कादोडी एकांकिका मिळाल्यो. सायमन रॉड्रिग्ज याई पाकिस्तान आन ढाका परवास कॅलतॉ तॉ अनुबव कादोडी मिनॅ परवासवरनना रूपात मिळाला. बगीता बगीता मापा जकल्या परकारसा ऑबडा साहित्य जमा जाला. आतॅ या जकल्याआ मॅ करॉ का? काहा जमॅसा माला? इ बाशा माला अजून हुमजालेली नाय. कॉडॅ प्रश्न. माआ डॉखा दूखॅ लागला. मापा कादोडीतसा लोकसाहित्य आन ललितसाहित्य दोनू परकारसा जमा जाल्ता. तॅइ वाट्नि करॉन तॅऑ सामाजिक, सांस्कृतिक आन वाङ्गमय अहया आंगानॅ अब्यास करॅसॉ हॉतॉ. तॅआ आदी माला या समाजाव इतिहास, तॅँशी संस्कृती समजॉन घॅना भाग हॉता.

मॅ ठरविला गा कय पन आन कॉडा पन जाला तरी या नांगराला हात घालॅसॉस. पन मनात धाकधुक होती. कारन जॅआ जॅआ माहनांना मॅ भेटली ते जक्ले नावानॅ, मनानॅ आन ज्ञानानॅ मा पेक्षा बोठ्ठे होते. तॅआ जक्ल्यांना तॉँड दॅसा हॉता. मागॅ हट्लि तॅ कदाचित जक्ले माई टिंगल करदॅत या विसाराय माई नीज उडालती. ‘पुडॅ वय मांगॅ नय’ अही माई गत जाल्ती. भगून मॅ ठरविला गा पयली इ बाशा हिकोन घ्याशी. ती निखळी लिखान वासॉन जमनार नाय. तॅतॅन मॅ उल्टॉ परवास सुरू कॅलॉ. शेवटी करॅसा काम पयला कॅला. ॲखादी बाशा हिक्या करतान तॅआ बाशेतशा समाजात- माहनात जाऑन बॅहॅ लागातॅ, तॅआ हरी बॉलॅ लागाते. भगून मॅ मुलाखती घॅदो सुरवात केली. त्यामूळॅ जाला आहा गा मॅ जॅआ जॅआ घारा गेली तडे माला बाशा आन संस्कृती जवळनॅ अनुबवता आली. मॅ पास मुलाखती घॅसा ठरविलता. तॅतशी पयली मुलाखत फा. फ्रान्सिस कोरिया यांशी घेट्ली. कारन कुपारी समाज

मिंजॅस सामवेदी समाज आणि सामवेदी बोलीबाशा योरसा पयला संशोदन फादरनॅस केल्ता. तॅआ वाटेओरनॅस माला जासा हॉता भगून पयली मुलाखत तॅशी घेट्ली. मनभरॉन तॅइ माला आशिर्वाद दिलॉ आन तॅशा कबाडातशे कैक पुस्तके माला भॅट दिले. तॅत मा कामाय पुस्तके जास्ती होते. अडे माला कत्तॅस बाहता यासॉ नाय अहॉ अनुबव आलॉ. आन तॉ माकून माकून आलॉ. तुमशा कामोर तुमी प्रेम करत्या हायद्या आन नाखॉडॉ धीर धरलॉ तॅ यॅस तुमाला मिळनारूस. मॅ कादोडीमिनॅ लीवलेली कादंबरी शोदीतोती. तही मापा सिरील मिनेझिसशी 'बबन' इ कादंबरी होतीस पन कादोडी बाशा ओडी जुनी हाय तॅ तॅआ मिनॅ अगोदर कुनॅतरी लीवॅसॉ प्रयत्न कॅलॅ हायदॅस आहा माआ मनात हॉता. दिवंगत सी. बी. दोडती यांशी 'सावट' इ कुपारी समाजाओरशी पयली कादंबरी हाय इ आयकील्ता. जाम शोदीली. लायबरीत बगॉन जाला. बॅतान जनांना विसरॉन जाला आन शेवटी फादरश्या कबाडात दोडती यांसा जक्ला साहित्य हापडला तॅत इ होती. मिंजॅ 'हलाडी लेकरू आन गावाला वॅडॉ' अही माई गत जाली. तिगाळा माअॅ डॉळॅ भरलॅ तॅ फादर बोयले, 'हा शुभ संकेत समजा तुमच्या कामाचा. पाहा चर्चचा घाट पण वाजला. तुम्हांला तुमच्या कामात नक्कीच यश मिळेल.' तॅसा आशीर्वादा इ बॉलना आयकॉन मा आंगोर काटे आले. नवॉ हुरूप आलॉ.

तिगाळा मॅ ख्रिस्तोफरशा नेहमी संपर्कात अहॅशी. तॅनॅ माला हांगीलता गा सी. बी. दोडती तॅव मामरसॉ आजोबा. तॅनॅ पन माला दोडती यांशे कैक पुस्तके दिले. मॅ आतॅ जक्लि वाट्नी करॉन वाश्या सुरवात केली. सिरीलनॅ माला फा. कोरिया याई लिवलॅला 'सामवेदी समाज आनी सामवेदी बोली' इ पुस्तक दिल्ता. तॅतनॅ सामवेदी ब्राह्मन आनी सामवेदी ख्रिस्ती लॉकांव इतिहास माइत जालॉ. पयल्या दोन धडॅइ तयारी करता येदे आहा वाटॅ लागला. कादोडी बाशेतशे दा-पंद्रा पाने रॉजश्या रॉज वाशॅशी, तॅतशॅ सब्द, म्हनी वाकप्रचार याव अर्थ समजॉन घॅशी. मजा येतोती काम करताना. कुपारी समाजातशॅ पयलॅ संशोदक फा. कोरिया, पावलू मास्तर, पयलॉ कुपारी नाटककार बबन गुरजी, पयलॉ एकांकिकाकार सिरील, अयल्या पयल्या कादोडी अंकाव संपादक ख्रिस्तोफर आन कुपारी महोत्सवाव आयोजक जिम यांशा मुलाखतीतनॅ माला खुब बॉठ्ठा सामाजिक आन सांस्कृतिक भांडार मिळाला.

दर आयत्वारॅ मा गाडा वसय-विराडा जासा. कतॅ सामवेदी सम्मेलन, कतॅ कादोडी माई कवतीकाइ, तॅ कतॅ लोकगीत स्परदा. कुपारी महोत्सव अहया जकल्यात जकॅसा. एकुन मा काम जॉरात आन मजेत सुरू हॉता. एक दी माला सिमसन रॉड्रिग्जसॉ फोन आलॉ. बोयलॉ गा मा घारा एक गेटटुगेदर ठवॅसा हाय. तॅनॅ पत्रकार भाऊ तोरस्कर, सिरील मिनेझिस, सचिन मेंडिस, बावतीस पेडीकर, जीम अह्या माहनांना वारना कॅल्ता. मस्तपैकी जीवनाऑ बेत कॅल्तॉ. मॅ कुपारी संस्कृतीऑ अब्ब्यास करतॅ तॅतॅन जिव्यादो इंद्याल, कोमडी, सर्पतेल,

वाला गॉळॅइ भाजी, सान्ने केलते. रोटयो आन चिकन भारीस जाल्ता. तडॅ कादोडी बाशेओर शरशा जाली. ई बाशा टिकव्यादो का का करता येदॅ योर भाऊ तोरस्करनॅ आपला मत हांगीला. सिमसनसा आख्खा कुटूम तॅइ दादय, काका, बायकू, बेन, हाऊ जक्ले आमशी सरबराई कॅरॅदो गुतलोते. जिगाळा जक्ले जा निंगाले तिगाळा परतेका हाता मॉट बांदॉन दिली. तॅत वसयशे सुकेळी, सामट्यो, रॅवाळा, केळे आहा पंचरशी खाना हॉता. मॅ मायारनॅ हाऱ्याआ साल्ली आहास माला वाट्या लागला. तॉ दी मॅ कत्तॅस बाहॅशी नाय. तॅ दिहापासून माआ अब्यासाला दिशा आन वेग मिळालॉ ई मात्र खरा.

दर आयत्वारॅ आन हुट्टीआ दिहा मॅ वसयला कुनान कुना घारा अहॅशी. तॅतनॅ माला खूपशी माइती परतेका दरनॅ मिळाल्ती त्योरनॅ मा दुहऱ्या परकरनाई तयारी जाली. तॅआ करता लागनारॅ फोटो घॅता आलॅ. तॅआ आन सुरवातीला घॅटलॅल्या मुलाखतीऑ उपयोग माला संशोदना परिशिष्ट मिनॅ देता आलॉ. दर वहराश्या कुपारी महोत्सवाआ खाद्यमॅळावॅतनॅ कुपारी खाद्य-संस्कृती अनुबवता आली, बगीता आली आन साकीता पन आली, खॉटा कदॉ बॉलॉ.

आहा जक्ला बेसखास्सा सल्लोता तव दोन वहरा करता जक्ला बन जाला. कोरोनानॅ कडॅ जा - या शी बंदी घायली. माई बॅतान रगाजळ जाली कारन मा काम अडकाला. पन बॉलातॅत ना ‘जा हॉतॅ ता बऱ्या करता हॉतॅ.’ कोरोनात जॉ वेळ मिळालॉ तॅत मॅ माआ लिखानाला सुरवात केली. कादोडी, पाशीहार आन ख्रिस्तायन मिनश्या लिखाना आकलन आन वाटणी कऱ्या सुरवात केली. जॅआ जॅआ वॅळा अडसन आली तॅआ तॅआ वॅळा सॅबी, ख्रिस्तोफर आन डिमेलो सर यांशी मदत घॅऑन काम सुरू ठ्विला. या बंदी काळात ऑनलाइन प्रोग्राम बो जालॅ. ऑनलाइन भॅट हॉया लागली. एक दी मॅक्सवेल लोपीस यानॅ फोन कॅलॉ. कादोडी बाशेओर मॅ काम करतॅ इ तॅला कुनॅतरी हांगीलता. तॅ शांती संवाद आन मुक्त विचार मंच याय दर आठोड्याला ऑनलाइन व्याख्यान हॉअॅसा तॅ तॅडॅ मा व्याख्यान ठवॅसा हॉता. पयल्या फोन मिंनॅ आमी खुब जुने मित्र हाव अह्यापरकारशी आमशी गट्टी जमली. खरा हांगो गा मा पॉटात फाळ आल्तॉ. तॅआ व्याख्यानात कुनॅ कय विसारला तॅ माला बरबर हांगता येदॅ गा, मा कय सूकॅसा नाय ना याई धास्ती वाटातोती. ‘उंदराआ पॉराला लॉखांडाअॅ व्यवार हांगीलॅ कुनॅ’ आहा कडॅ लोक बॉलद्यात गनी. पन जकल्याई माला हांबळॉन घॅटला माआ मोडकॅआ तॉडकॅआ कादोडीसा कव्तिक कॅला जॅनॅ माला बॅतान हुरुप आलॉ.

कोरोनाबनॅ कुनाला भॅटता तॅ येत नॉता. तिगाळा मोबाइल आन लॅपटॉप मिंजॅ आपलॅ डॉलॅस. याव आदार घॅऑन मॅ फेसबुकवरशॅ कुपारी लेखक शॉदॉन काडलॅ. तॅँआ लिखान

जमा कॅला. तॅत माला कादोडी एकांकिका लिवनारॅपन भॅटलॅ पन सिरील मिनेझिस हारका लिखान जपवॉन ठवनारॉ, तॅआ हांबाळ करनारॉ बी कून लेखक माला भॅटलॉ नाय या वाईट वाटातॅ. एकांकिका लिवनाऱ्या कैकांना दोन तीन वहरे मांगॅ मांगॅ लागॉनपन, तॅंइ आज देतॅ-उद्या देतॅ आहा हांगात हांगात शेवटपोत एकांकिका दिल्योस नाय. एक दॉगाई कुरीयर कॅलॅ आहा पन हांगीला पन आजपोत माला कय कुरीयर पॉस्ला नाय. आमसा लिखान इला कादो दॅसा? ई कून आली आमश्या लिखानोर बोल्नारी आहा जर तॅंना वाटलॅ हायदॅ तॅ, तॅआं का सुकला? क्लेमेंट डिमेलो आन ईतर लॉकांइ तॅंआ बरास लिखान व्हॉट्सप वरनॅ धाडला. तॅत एकदोन एकांकिकापन होत्यो. मॅ युट्यूबवर अहलेल्यो एकांकिका शार-शारदा बगॉन, आयकॉन मंग लिऑन काड्ल्यो. तिगाळा माव जीव हॅवसॉधॉक जालॉ. ई जक्ला करता करता मॅ मा हरी कादोडीतुस बॉलॅशी आन माला ॲनारॅआ मेसेजला कादोडीत उत्तर द्याशी.

शांती संवाद आन मुक्त विचार मंचश्या व्याख्यानाला बरॉ प्रतिसाद मिळालॉ. तॅतनॅस सामवेदी-कादोडी सब्दसूची तयार करॅशी कल्पना बॅतान जना डॉखॅतनॅ आली. मंग सामवेदी शब्दसूची नावासॉ व्हॉट्सप ग्रुप बनवीलॉ. मंग त्योर दर आठोड्याला एकेक सब्द घॅऑन तॅआ विषयी माइती (मराठीत अर्थ) जमा कऱ्या सुरवात केली. ई मा आब्यासाला जाम उपेगी पडला. यानॅ माला कादोडी सब्द कळॅ लागलॅ. आन मा विसारात भर घायली. जाम मजा याशी. ॲकास सब्दाला कॉडॅ अर्थ. जहॅ बोल तहॉ अर्थ. ॲका वस्तुआ वॅगवॅगळॅआ भागांना वायलॅ वायलॅ सब्द. जहा की केळीआ रॉपाशा ॲकालास पोंगी, आंगाठ, खॉलॉ अहॅ सब्द आयकॉन-वासॉन माला तॅ आहा वाटातॅ गा कादोडी हारकी समृद्ध बी कुहनीस बाशा नाय.

माआ संशोदन कामात तीन फादरांई माला जाम मदत केली. फा. फ्रान्सिस कोरिया ॲतर माय मार्गदर्शकूस. तॅंआ सामवेदी बोली आन सामवेदी समाज या दोन पुस्तकाबिगर माऑ अब्ब्यास जालॉस नस्तॉ. मॅ खुपशा कुपारी सांस्कृतिक प्रोग्रामला जाशी. तडॅ मॅ एक गानॉ नक्की आयकॅशी, 'लीविती वाशिती ऑबाय माजे.' माला ऑ गानॉ खुब आवडॅसॉ. माला कुनॅतरी हांगीला गा ऑ गानॉ फा. संजीवप्रसाद परेरा याई लीविलॅ. आतॅ तॅ आजारी अहतॅत, तॅंआ वय पन जालॅ. एक दि मनोर घॅटला आन फादरसॉ पत्तॉ शोदीलॉ आन पारल्याला पोसली. पयल्या खॅपॅत तॅइ माला कोडी माइती दिली. जोक कोडे हांगिले गा मॅ विसारातूस पडली. माला वार्ता करॅशी भारी होस भगून माई आन फादरशी पटकान दोस्ती जाली. (फादर आतॅ आपलॅत नात, पन तॅंआ आठोनीओर मॅ एक लेख लीविल्तॉ जॉ गॅल्या वहरा ख्रिस्तायनमिनॅ छापॉन आल्तॉ. आज फादरशी जाम खीत येतॅ.) फादर प्रसाद परेरा याई माला कुपारी उखानॅ, कान्यो, तॅइ लीवीलॅलॅ गानॅ अहॉ बरॉस ऐवज दिलॉ. फादर नेहमी मा काम कोडीपोत आला

याई सौकशी करॅशे. तहास फादर कोरिया पन नेहमी फोन करॉन विसरॅशे. तँव फोन आलॉ गा मॅ घाबरॅशी. पन तँई धास्ती माआ कामा करतास होती.

फादर ज्यो आल्मेडा याई पन माला कुपारी गानॅ दिल्तॅ. वसयश्या बऱ्यास लॉकांना माआ संशोदनाबद्दल माइत जाल्ता तॅ ते सॉताहून माला तॅआ लिखान धाडतोते. मा काम सॉप्पा हॉॲसा तॅ आतॅ अड्सनीआ जाला. ऑब्डॅ लेख–कविता जमा जाल्यो. तॅतनॅ का टूकॅसा आन का ठवॅसा इस हुमजात नॉता. मंग मॅ ठरविला आन २०१९ पोत लीविलॅल्या लिखानातनॅ जा कय बरा लिखान हाय तास घॅसा. आन त्योर काम करॅआ सुरवात केली. मॅ निवडलेल्या लिखानाऑ अब्ब्यास सामाजिक, सांस्कृतिक आन बाशिक आंगानॅ अर्थ लाव्ना, तॅआ विश्लेशन आन तॅआ मॉजमाप अह्या परमानॅ कॅलॉ. इ काम वाटातॅ तॉडा सॉप्पा नॉतास पन जाम आवडॅसा. अब्ब्यासा निमतान मा मन या बाशेत गुतात गॅला. दरवेळी कयतरी नवा हापडॅसा तॅऑ आनंद जास्ती हॉतॉ. खरा हांगॅसा तॅ अर्थ लाविताना माला या बाशेआ सब्दसंपत्ती आन तॅआ ताकतीइ कल्पना आली. ऑ जक्लॉ सब्दसंग्रह करताना मॅ भारावॉन जाशी. उदारन दॅसास तॅ निहन–निहान, तळोर–तळ्योर, भगून-बगुन, बॅहॉन–भॅऑन, भेहली–भाहली, आहु–हाऊ अहया कॉडॅ तरी सब्दामिंसॉ फरक लक्षात घॅऑन अर्थ लाविताना नातॅ एकुस सब्द पन तॅसॉ वॅगवॅगळॉ अर्थ ध्यानात घॅऑन अर्थ लाविताना मॅ कादोडीश्या बुडा जा लागली. ऑ अनुबव जगा वायलॅय. गालिबनॅ हांगीलॅ परमानॅ, ‘ये आग का दरिया है बस डूबते जाना है !’ या बाशेत हांगॅसा तॅ ,’पानी ऑंडा हाय उपॅसॉ बास.’

पीएचडी बोयला गा लॉँकां नंदऱ्या तारॅ दिखातॅत. ता बगॉनुस पीएचडी करनारॅला टेन्शन येदॅस. अब्ब्यासाऑ एक वायलॉस तान आहातॅ. पन माई बाजू बऱ्याई होती. माला कुहनॉस तान नॉतॉ उल्टॉ आनंद हॉतॉ. हुट्टीआ दिहापन मॅ खा-पॅसा हॉडॉन काम करीत बॅहॅशी. दिहाशॅ १२ तास कमी पडॅशॅ. राती २-३ वाजॅपोत काम करताना मॅ कुपारी सांस्कृतिक वातावरनात गडाप हॉयॅशी. या जकल्यात माला मदत करनाऱ्या लॉकांव पन खारीऑ वाटॉ हाय. राती-पातेराती मॅ सॅबी, ख्रिस्तोफर, डिमेलोसर, सिरील, बर्नादितबाय, वेरोनिका- बाय आन मॅक्सवेल यांना तरास द्याशी पन तॅइ कत्तॅस न शिडता-वैतागता माला मदत केली. याय आबार कुहनॅ सब्दात मानॉ.

मा पेक्षा बीया लॉकांना माआ पीएचडीशी धास्ती जास्ती लाग्लोती. मॅ पीएचडी पुरी करनॅ गा नाय आहा तँना वाटॅसा. पीएचडी कऱ्या ऑडा टाइम लागाते? मंग कतॅ पुरी हॉॲशी? अहे प्रश्न तँना पडॅशे. पन मॅ कत्तॅस भांबावली नाय. माआ नंदऱ्या समोर एक तारीक होती तॅआ आदी मा काम पुरा हॉनार ऑ विश्वास हॉतॉ. भगून मॅ आरामात, विहांबॉ घॅत मा काम कॅला. पन शेवटसॉ एक मयनॉ मिंजॅ घरात लगीन हाय तही गत. शारपास वॅळा ६४३ पानाऑ आख्खॉ परबंद वासॉन काडलॉ. प्रूफ वाशिताना मॅस चकित जाली. कतॅ कतॅ वाटॅसा इ जा का मॅ लीविलॅ

ता बरबर हायदॅ ना ? कतॅ कतॅ माला नवीन कयतरी सुशॅसा. मंग मा मार्गदर्शकानॅ माला हांगीला गा खरॉ संशोदक आपल्या कामाबाबतीत समादानी नहातॅ. तॅला नेहमी कयतरी नवा सुसतास आहातॅ. पन कडॅतरी थांब्या पाय. तुआ जक्ला काम भारी हाय. तॅत तुई मेहनत दिखातॅ. जिगाळा ऑ परबंद मॅ शेवटसॉ वासॉन काडलॉ तिगाळा माला पटलास नाय गा इ ऑडा मॅ लीविलॅ भगून..

स परकरने आन परिशिस्ठ अहॉ ६४३ पानाऑ परबंद मॅ विद्यापीठात दिलॉ. मुंबयशा बारशा दोन तपासनीसाई तॉ एकदम खारॉन-खॉरॉन तपाशीलॉ आन साताठ मयनॅत रिपोट दिलॉ. तॉ गुप्त अहल्याबनॅ माला बग्या मिळालॉ नाय. पन माई मार्गदर्शक जाम खुश होती. ता बगॉन माला बरा वाटला. दुदात हाकर मिंजॅ मा वाडदिहास माई तोंडी परिक्षा होती. परीक्षेआ सुरवातीलास मॅ जकल्या कादोडीतुस स्वागत कॅला. परबंदाइ रशना-मांडनी कही  केली ता हांगीला.

मॅ कॉडा अब्ब्यास केल्तॉ तॅॲ फोटो, गानॅॲ विडीओ पन तॅँना दावडलॉ.  तॉ बगॉन परीक्षक खुश  जालॅ. आन माआ वाडदिहाश्या दिहास माला डॉक्टरेट पदवी सन्मानानॅ दॅऑन टाकीली. मा वाडदिहासा इ खुब बॉठ्ठा बक्षीस हॉता. तोंडी परीक्षेला सॅबी, डिमेलोसर, ख्रिस्तोफर, सिरील ये माॲ खांब माकरता उबी हॉतॅ. ‘नेहा बाय अबिंनंदन’ इ तॅइ हांगता खोटी माआ डॉळॅत आनंदाॲ आहु आलॅ. कारन या माहनाई मानाई आन नात्याई ‘बाय’ इ उपादी माला दिली. माव जक्लॉ परवास, अड्सनी माला आठवात्योत्यो. मा मन माला बोयला, ’याचसाठी केला होता हा अट्टाहास.’

खरामिंजॅ हांगन्या हारका खुब कय हाय. पन जकलास हांगता येदॅ गा..? या परबंदानॅ माला बॅतान आनंद दिलॉ. समादान मिळाला. मराठीत हांग्यासा तॅ, ’मी ताणरहित अवस्थेत, आनंदाने स्वान्तसुखाय अभ्यास केला. याचं श्रेय माझ्या एकटीचं नाही तर मला मदत करणाऱ्या प्रत्येक माणसाचं आहे. आपण मराठीच्या भाषाभगिनींचं साहित्य कुपारेतर समाजापुढे आणलं.’ या आनंदाबरबरूस माला बॉठ्ठा मायार मिळाला, इ कोडी बोठ्ठी गोष्ट. अर्थात माआ काम परिपूर्ण जाला आहा मॅ हांगॅ नाय. आन इ काम खपला आहा पन हांगता यासा नाय. तॅआ मीनॅ पन बारीकसारीक सुका अहनारूस. उलटा आतॅ या कामाला नवी दिशा मिळदॅ, तॅत वाड हॉत जायदॅ अही आशा हाय. या कुपारी समाजाऑ, बाशेऑ आन साहित्याऑ नवॉ इतिहास जिगाळा कतॅ लीविलॉ जायदॅ तॅत एक पान एक इट मा नावाशी अहनार ऑडास माआ करता लाखमॉलाआ समादान.

# ओळख - सॅबी परेरा, नानभाट

दादीआ मामारा लगीन हॉता. तीआ मामबाहाशा नातनीआ लगीन. खरा मिनजॅ ऑड्या लांबशा नात्यात मॅ लग्ना-बिग्ना जाय नाय. पन दादी हांगातॅ तुआ लग्नाला ते जकले आलते. माला वरमायसॉ अयेर हाय. त्याइ माला भारीपैकी मोरपिशी लाउसपीस दिलता. तुइ अयेरायी डायरी बग. त्यातपन, पन्नास-शंबर रुपय अयेर लीविलॅलॉ हायदॅ. तू जाय मिनजॅ जाइस. आपल्याला अडॅ हाकोटे जिव्या का कॅलता त्या हांजशापारा यॅद रॅ नाय, अन या बायकांना पंचवीस वहरा आदी कुनॅ आपल्याला कुहन्या रंगा ब्लाउस पीस दिलता ता काहा आठवातॅ कुना गाई.

हांच्यापारसॉ प्रोग्राम हॉतॉ. अयेरा पाकिटात पाचशे रुपय घायलॅ. पाकिटोर दादीआ नाव लिवीला. बाईक घेटली अन निंगालॉ. लग्ना रिसेप्शनसॉ प्रोग्राम दोपारा अहलॉ गा जरा बरा आहातॅ. दोपारा बारा तॅ तीनपोत लोक वाटला गॅल्यामुळॅ एकास टायमाला घनी गर्दी हॉयॅ नाय. पन हांच्यापारसॉ प्रोग्राम अहलॉ गा जकल्यांना आठ वाजता पॉसॉन, अयेर घालॉन, जीवॉन, नव वाज्यादो कडीला हात पुहीत घारा जाशी घाई आहातॅ. त्यामुळॅ आठ तॅ नव या टायमात लग्ना मांडवात हातोर हात आन पायोर पाय अही परिस्थिती आहातॅ.

मॅ पॉसलॉ. रस्त्या मॅरॅला स्कुटर ठव्यापन जागा नोती. एक बाइक जुरुक खशविली अन त्या मिनॅ माइ स्कुटर घुशविली. मांडवात गॅलॉ. बगीतॅ तॅ नवरा-नवरीला शुभॅच्छा द्यादो अन अयेरादो भोट्ठी लांबी लाईन लागलोती. एका मॅरॅ ड्रिंक्ससा काऊंटर हॉता. तडॅ बाइमीनॅ पानी डोंबिल्यॉर मावरा उमातॅ ताहा लोक उमालता. जीवना करता शार-पास काऊंटर अहल्या मुळॅ, त्यातशा त्यात जीव्यादो कमी गर्दी दिखातोती. घरनॅ निंगालॉ तिगाळा मॅ मनातशा मनात एखाद दुहरॉ पेग मारॉन, मंग जिवॅ अहॉ बेत कॅलतॉ. पन ड्रिंक्सशा काऊंटरवर गर्दी बगॉन अन दुहऱ्या दिहा कामोर जासा हाय ऑ विसार करॉन मॅ दारूऑ प्लॅन कॅन्सल करॉन जीवना लाईनीत जावॉन उबॉ रॅलॉ.

लाईनीत मा पुडॅ एक कॉलेजवयीन पोरी उबी होती. पायात हाय हिल्स अन आंगात सलवार कुर्ता घायलेली. माथा मोकळा होडलेली. हलकॉसॉ मेकअप केलेली.

वॅळापारा आपल्या हाताय, तोंडोर यॅणारी माथ्याइ बट मांगॅ करणारी. तिनॅ मांगॅ वळॉन माओर बगीला अन स्माईल दिला. ती पोरी डिट्टो सरिता दिखातोती. तीस वहरा अगोदर मॅ कॉलेजमीनॅ शेवटशी बगीलती तहिच्चे तही सरिता. माला रॅवाला नाय. मॅ तिला विसारला, "तू सरिताइ पोरी गा?" ती हांगातॅ "हां". आमसा बॉलना आयकॉन, लाईनीत तिआ पुडॅ उबी अहलेली ती मम्मी मागॅ वळाली. तीस होती ती.. सरिता... ऑड्या वहरानंतर सुद्दा सहज ओळखणे- बल... फार कय बदलली नोती. तरुणपणी होती तहीस कॉन्फिडन्ट, ग्रेसफुल, डिसेन्ट, स्लीमट्रीम. आज ती तिगाळ- शा पेक्षा जुरुक घनीस मॅच्युअर्ड दिखातोती. किमतीनॅ भारी पन सोबर कलरशी साडी, शरीर प्रदर्शन हॉणार नाय अहा ब्लाउस, काना-गळ्यात मोजकॉ दागिनो, माफक मेकअप, तास जुना ओळखीआ कातिल स्माईल, सगळा तिला अन तिआ स्वभावाला सॉबॉन दिखणारा!

"तू! ऑड्या वहरान? हॉतॉ कडॅ?

तिआ ओठोर-सा स्माईल, बॉलण्याशी मिठ्ठास, अन डॉळ्याशी चमक यात जुनी ओळख अन आपले- पणा दिखातोतॉ. तिनॅ हात हातात घॅवॉन माइ चौकशी केली. लाईनीत उब्या उब्यास कॉलेजशॅ दि रिवाईंड करॉन जालॅ. टाळ्यांय, पापोळ्याय झॅंडॅ फडकावॉन जालॅ. पोरे किती? करत्यात का? बायकू, नवरॉ, नोकरी, घर, अल्लामत चौकशी करॉन जाली.

ऑड्यात आमे जीवना काऊंटर पोत पोसले. तिनॅ प्लेट टुकीली. टिश्यू पेपरनॅ पुहील्याघती केली अन मा हाता दिली. अन मग सवताकरता प्लेट घेटली. मग सरिता, तीइ पोरी लॅरिसा अन मॅ आमी तिगे एका मॅरशी जागा पकडॉन जिव्या बॅहॅलॅ. का का विषय निंगाले अन आमे का का बोयले, कोडे हावले अन आमे जीवतॅ हाव तव आमशा मॅरनॅ कोडे लोक जीवॉन उठॉन गेले ता आमशा आमाला पान माइती नाय. जिव्यादो चिकन-मटन हॉता गा दंडुइ भाजी इ माला कुनॅ विसारलोसा तॅ माला हांगता आला नसता. लॅरिसा पन आमशा गप्पांत सामील जालती अन मनापासून आमसा बॉलना एन्जॉय करतोती. जीवॉन उठले अन वॉश बेसिनपा हात धव्या जातोतॅ

तिगाळा लॅरिसा बोयली "अंकल, तू आवडलॉ माला. एक दी घारा ये. आपुन जाम गप्पा मारॉ, धम्माल करॉ"

आमे जिवले तव अयेराइ लाईन कमी जालती. आमे तिगी एकत्रस स्टेजवर गेले. नवरा-नवरीआ अभिनंदन कॅला. नवरा-नवरीआ दोन मॅरॅ उबी रॅवॉन फुटू काढलॉ.

एक अख्खॉ तास शून्य मिनटात खपलॉ. मोबाईल नंबरशी दॅवानघॅवान जाली. निघताना सरिता आणि लॅरिसा दोघांसोबत हलकीशी गळाभॅट जाली. पुन्हा ठरवॉन भॅटयाशॅ वायदॅ जालॅ. शरीराला, मनाला, काळजाला कुनॅ तरी कातकुल्यॉ खावडल्या घती वाटातोता.

त्यास तंद्रीत घारा गॅलॉ. बेल वाजविली. बायकूनॅ दरवाजॉ उघडलॉ. आज लग्नाला ओडे वहरे जाले तरी बायकूपासून कय लिकव्याशी कला माला अजून जमली नाय. मा तोंडोर बगॉन ती बोयली, "आज हांग्या हारकी किंवा लिकव्या हारकी कय जिनक घडले वाटातॅ". आहा बॉलॉन ती खुद्कन हावली. ती  हावली गा ओडी भारी दिखातॅ की आपुन मनातशा मनात का स्टोरी बनविलॅ हायदॅ त्या स्टोरीआ सुमाळना ऑहॉन जातॅ.

मॅ कय न बोलता घरात गॅलॉ. कपडे बदलले. हातपाय धविलॅ अन यॅवॉन हॉल मिनॅ सॉफ्यात बॅहॅलॉ. बायकूनॅ हाता गराम गराम कॉफीआ कप दिला अन सवता हाताव टी करॉन माला हांगातॅ, "बॉल आतॅ ...."

मॅ, जा का जालता (माला मनात का वाटला ता हॉडॉन) जाहाच्चे ताहा बायकूला हांगॉन टाकीला. कॉलेजमिनॅ असताना जालेली मज्जा. मित्रा बरबर मारलेली पैज. घाबरात-घाबरात तिला 'मा बरबर कॉफी प्या येता गा' विसारलोता ता. "सल" हांगॉन ती बिनधास्त मा बरबर हॉटेल ऋषिकेश मिनॅ आलती ती. "तू तुआ मित्रा बरबर माला कॉफीला घॅवॉन जाशी पैज मारले ता मॅ आयकिलॅ. अन तू हरलॉ पा नाय आहा माला वाटातॅ. भुगुन मॅ तूआ सोबत आले." तिनॅ मस्तपैकी आव्हात आव्हात हांगीला. जाताना बोयली की, "तू खूप सज्जन पॉर हा. ऑहॉस रॅ. अभ्यासोर अन करियरवर लक्ष दे." माला का बॉल्यासा तास सुसला नाय. मॅ एकशिती टेबलोर बॅहॉन रॅलॉ. मेदू-वडा अन कॉफी घेटलोती त्या बिल पन तिनॅस दिला.

बायकू माकून एकदा मनापासून आव्हली. मंग मा गालूटाला शिमटॉ काडीत बोयली, आतॅ तरी ओळख... ओळख तिला अन तुला सवताला पन! कॉलेजशा दिहात कॉड्या डिसेंन्टली तिनॅ तुला नकार दिलॉ अन आज कॉड्या सहज तिनॅ तुला मित्र म्हणून जवळ कॅला इ बग. तू अजून गर्लफ्रेंड म्हणून तियेस स्वप्ने बगिता हायदा तॅ याव अर्थ ऑडॉस की तुला अजून तीइ ओळख पटली नाय. कॉलेजशा

दिहात ती तुला पटली नाय या कॉम्प्लेक्स मिन्ने बार ये राजा. अन या वयात एक खूप भारी, मॅच्युअर्ड मैत्रीण मिळाले यात आनंद मान.

दोनेक मिनिटे पॉझ गॅलॉ. कुन कइस बोयला नाय.

बायकू पुडॅ बोयली, "खरा हांग, तीऑ नंबर तुआ मोबाईल मिनॅ का नावानॅ सेव्ह कॅलॅ?"

मॅ कइस बोयलॉ नाय, नकळत माइ जीभ साविली.

बायकूनॅ मा हातसॉ फोन घॅटलॉ. त्यामिनॅ रिसेन्ट डायल्ड नंबर हॉतॉ ‘संतोष इलेकट्रीशन’. ता नाव एडिट करॉन तिनॅ "सरिता" नावानॅ सेव्ह कॅला.

व्हाट्सऍप मिनॅ गेली. अन मा वतीनॅ सरिताला एक मॅसेज लिविलॉ, "आज कित्येक वर्षांनी तुला भेटून खूप खूप आनंद झाला. कृपया येत्या रविवारी सहकुटुंब आमच्या घरी जेवायला या. माझ्या बायकोला देखील तुम्हाला भेटायला खूप आवडेल." फोन मा हातात दॅवॉन माला तॉ मॅसेज सेंड कऱ्या हांगीलॉ. मॅ मॅसेज धाडलॉ. शून्य मिनिटात त्याला ब्लू टिक, सव्वा सेकंदात त्यावर हॉकार कळविणारॉ मॅठॉ अन पावणेतीन सेकंदात "नक्की येतो" आहा उत्तर आला.

मॅच्युअर्ड मैत्रिणी लाख मिळद्यात पन ओडी मॅच्युअर्ड बायकू मिळ्यादो भाग्य लागातॅ. माला मा बायकूआ जाम कौतुक वाटला. मॅ माला जमॅदॅ तॉडा गॉड स्माईल दिला. अन ती पंचेचाळीस वहराइ बावली खिदळया लागली. ओळख पटली!

# हयरा जकला – फ्रान्सिस डिमेलो, दोनतलाव

उंबरगोठनीआ नाक्योर आज हुकळीआ मावरा आल्ता. तळ्यात मावरा उमावातॅ तहा लोक मावरा घ्यादो उडॉन पडलोता. हातोर हात आन पायोर पाय ! लॉँका गराड्यात कोळन्यो हारक्यो दिखातू नोत्यो. नाताल कोळन थोडी फटीतनॅ दिखातोती. कादो, तॅ ती लिक्याहारकी नोतीस.

इशानॅ जाम घासाघीस करॉन जेबूदरनॅ एक अस्नि बोठ्ठी दातळ सव्वा रूपाला घेट्ली. सौदॉ बरॉ जमलॉ याई खुशी होतीस तरी तॅआ ध्यान ठिकानोर नॉता. तॅआ दोसत बिशा आज कडॅ दिखॅ कय नाय या विसाराय तॅआ शीत उड्लोता. मावरॅय पैशॅ दॅऑन तॉ तॅआ गराड्यातनॅ ॲकदासॉ बायार आलॉ. पिशवीआ बार रेलेली अर्दी दातळ तॅआ पोन्याला लागातोती पन तडे तॅआ ध्यान नॉता. तॅय डॉळॅ बिशाआ वाटयोर हॉतॅ.

इशा आन बिशा ॲका हांवडीॲ आन जिवाभावाशॅ दोसत. तॅंइ यारी आख्ख्या गावाला माइति होती. दोगु लंगोटी मित्र, वटारशा बॉर्डा शाळीत ॲकास वरगात हिकातोतॅ. सव्वित गॅलॅ तिगाळा इशा बाबानॅ तॅआ नाव शाळीतनॅ काडला. तॅऑ दुदाऑ बॉठ्ठॉ पास हॉतॉ. गॉठॅत भई वाडात साल्ल्योत्यो. बाबानॅ इशाला हांगीला, ‘बाबूआ! शार बुके हिकलॉ तॅ खुब जाले. लीविता-वाशिता येतॅ ना बास जाला. तू बी कय हापिसर हॉॲआ. बास जाली शाळा.’ इ ऐकॉन इशाला तॅ शार पाय जालॅ. तॅनॅ दफ्तर खुटीला अडकविला आन गॉठॅत धाव मारली.

इशानॅ शाळा होडली इ कळताखोटी बिशानॅ पन शाळीऑ बेत पाडलॉ. तॅनॅ बेत पाडलॉ या घनास कुनाला कय वाटला नाय. नायतरी बिशाऑ वाडगे हाकाळ-हांज कैफाटलॅलॉ. पॉर शाळीत गॅलॉ का, नाय गॅलॉ का तॅला का फरक पडातोतॉ...?

इशा बिशाइ शाळा हुटली पन दोस्ती कय तुटली नाय. ताहां बगीला तॅ इशा बिशाशिन घरनॅ थॉडॉ थावर हॉतॉ. गावात तॅआ नाव हॉता पन तॅऑ इशानॅ कतॅ पंक्तिपरपंच कॅलॉ नाय. दॉगाय गाव मॅरॅदॅरॅस आन तॅंये भाटे तॅ एकदम लागॉनुस. दोगे रॉज एकदातरी भॅट्ल्याबिगर तॅंव दि जात नॉतॉ. दोगी हस्साल कॉमसार जालते. ॲकास दिहा किरीज्मात जालते. ऑडास नाय तॅ दोगाय लग्ने सुदा ॲकास वहरा मार्गॅपुडॅ जालते. इशाआ माआ मीनॅ आन बिशाआ पुहात. इशाऑस सुट-बूट आन भरू सज्जो घॅऑन बिशा वराडलॉ. इशानॅ तॅआ मुठीतशा अयेरातसॉ कय अयेर बिशाआ मुठीत घायलतॉ. दोगू ॲकमॅकाय बेसमन जाल्तॅ आन हप्पेरात नासलोतॅ. दॉगाॲ संवसार सुरू जालॅ, पोरेपारे जाले पन दॉगा दोस्तीत कतॅ वांदॉ आलॉ नाय. रॉज हाकाळशे ११ वासता उंबरगोठनीओर बॅठॅशेस बॅठॅशे. मावरा घॅऑन जाला गा जवळशास ठरलॅल्या पळीओर जाशॅ आन नवटाक नवटाक घॅशॅ. आज इशानॅ पैशॅ दिलॅ

तॅ दुहऱ्या दिहा बिशा पिरविटाला हात घाल्यासॉ. दॉगा मीनॅ पैश्योरनॅ गा बॉलनॅसालन्योरनॅ कतॅस कय वाजला नाय. आन रॉजसॉ बॅठॅसॉ रिवाज कतॅ सुकलॉ नाय.

भगून आज इशा बिशाई जाम वाट बगीतॉतॉ. तॅनॅ बांग्या दुकानातनॅ एक आन्याई सटनी घेट्ली आन तॉ माकून इशाई वाट बगीत ऊबी रॅलॉ. ऑड्यात हॅजाळसॉ मिंगू गॉपाळश्या हॉटेलातनॅ उसळपाव खाऑन बायार आलॉ. मिंगूई नजार इशोर गेली. मिंगूनॅ तॅला विसारलास, ‘इशा क रॅ ? आडॅ उबॉ रॅलॅआ तॉ...’ “कय नाय निखळॉस” आहा बॉलॉन इशा तड्ने जरा तॅंगा गॅलॉ. तॅनॅ ॲंगातॅंगा बगीला पन बिशा कय कॅल्या नंदऱ्या पडलॉ नाय. का करेसा कय सुसात नॉता. वखत साल्लॉ. हातातसा मावरा लागॅदॅ. बीआ मिंजॅ घरनॅ बॉंबाट ! ऑडॉ वखत जालॉ घारा डोकरीबय तलॅवलॅ करदॅ. ‘अजून क नाय दॅ आलॉ इशा मावरा घॅऑन?’ आहा विसरॉन ती घारा जकल्याव जीव खायदॅ. भगून इशानॅ बिशाऑ नाद होडलॉ आन तॉ रस्त्या लागलॉ.

घारा पॉसलॉ पन बिशा क नायदॅ आलॉ ऑ विसार कय कॅल्या तॅआ डॉखॅतनॅ जात नॉतॉ. तॅनॅ ओट्योरनॅस बायकूला हाक मारली, ‘अय हा कडे ? ई मावरा घेऊ‘मावरा बायकूआ सवादी करॉन तॅनॅ बयला लामनॅस हाक मारली, ‘बो मॅ आलॉ लो. आन जरा बाठात दांडपाळ सल्ले तडॅ जरा डॉकाऑन येतॅ.’ बयसॉ सब्द आयक्यादो तॉ थामलॉस नाय. जाताना बायकूला बोयलॉ, ‘दातळीयो रयो तिरप्यो हारक्यो काप. आन गाबोळी रश्शात नाका टाकॉ. तळ.’

इशानॅ बाठाआ नाव हांगीला खरा पन तॉ बाठात गॅलॉस नाय. तॅनॅ बारोबारनॅ बिशाई सवकशी केली. तिगाळा तॅला कळला गा बिशा उंगवत्या बाठात गॅलॅ. इशा तॉहॉस बाठात गॅलॉ. इशाला घनीस बगाबग कऱ्या लागली नाय. बिशा राटापुडॅ माळीकरता थाटॅ हुईत बॅहॅलतॉ. रागारागाय वावळी होकलतोतॉ. इशा समजॉन सुकलॉ की बिशाला आज कयतरी बांडॉ मारलॅ भगून. राटाआ आवाजात आवाज जासॉ नाय भगून इशा तॅआ एकदम मॅरॅ गॅलॉ आन बॉठ्ठ्याऑ बोयलॉ, ‘बिशा का रॅ? आरॅ नाक्योर कोडी वाट बगॅशी तुई ? का जाला ? आज तू आलॉ क नाई ? आज तुई गाडी जरा खिआंरले दिखातॅ ती.... का जालॅ..?’ इशानॅ जक्ला ॲका दमात विसारला. तॉहॉ कपाळोर हात मारॉन बिशा रागारागाय बोयलॉ, ‘आरॅ इशा तुला का हांगॉ ? मा बायकूआ पोटोर वालॅ. आरॅ तीनॅ माला विख खाशी पाळी हाडले.’ इशाला कय कळातूस नॉता. तॅनॅ विसारला, ’ऑडॉ कुहनॉ डोंगर खॉआळलॅ तूओरती? खॅप्पॅन विख खाशी गोष्टी कऱ्या लागल्या तॅ, तूआ नवरीनॅ आहा का कॅलॅ?’

‘आरॅ, तिआ पोटोर नांगर वालॉ तॅ, तिहॅदा पोरीस जाली.’ बिशाऑ रागाऑ पारॉ घनॉस सडलॉतॉ. इशानॅ कपाळोर हात मारलॉ आन आहात आहात बोयलॉ, ‘आरॅ मंग

आपल्या हॅजाळशा मिंगूनॅ किती वॅळा जीव द्या पाय ? तॅला तॅ लागोपाठ आठ पोऱ्यो जाल्यात. पन तॅनॅ आशा होडली नाय. या खॅपॅला तरी
बाबू नक्की हॉयदॅ या आश्योर तॉ मजेत हाय आन तू तीन पोऱ्यातुस खसॉन गॅलॉ तॉ.'

इशानॅ तॅइ समजूत घालॅसॉ परयत्न कॅलॉ पन बिशा जास्तीस संतापलॉ. 'माऑ अडे जीव साल्लॅ आन तुला शॅष्टा सुसातॅ कही? आन तॅआ मिंगूआ का बाबा, हॉना-नाना, आन दाना या कय कमी नाय तॅला. अजुन शार जाल्यो तरी पोहिदॅ आन पैशा बळोर जक्ल्यो वटायदॅ सुदा. मॅ का करॅसॉ ? कहयो वटाव्याश्यो माला हांग.' बिशा एकदम रडपतीला आलतॉ. आपल्या जिवाभावाश्या दॉस्ताई इ दशा इशाला कय बगवाली नाय. तॉ तॅआ मॅरॅ गॅलॉ, तॅआ खांदयोर हाथ ठॅऑन बोयलो, 'आरॅ बिशा ऑडास ना ? ऑ तूऑ दोस्त तूआ बरबर असताना तू कादो ओडी काळजी करता ? करॉ आपुन कय तरी !' इशा बोलन्योर बिशा थॅाडॉ शांत जालॉ आन जिवाभावाश्या इशादरी मन मॉकळा करीत हांग्या लागलॉ, 'इशा काहा हांगॉ तुला ? आरॅ ई पोऱ्याई अही रांग लागली तॅ मॅ तॅँना वटाईनॅ कॉहॉ ऑ मा जीवाला फासॉ आहीस पन मा जीवाला बी एक घोर लागलॅ.'

'आतॅ बी कॅआव घोर बाबा' इशानॅ जरा काळजीनॅ विसारला. 'आतॅ तुला काहा हांगॉ.? तू माऑ एकदम जवळसॉ भगून हांगातॅ, पन कुना तोंडोर बॉलॉ नाका हां..' बिशा या बोलन्योर मान हालवित इशा बोयलॉ,'तॅइ तू काळजीस करॉ नाका. मा दरनॅ अडसा तडॅ हॉऍसा नाय. बॅऑस नाका.'

'आरॅ, तॅ जालॅ आहा, ॲकमॅका पाठीओर दोन पोऱ्यो जाल्यापासून माई दादी आन बोठी बय दोगी मा नवरीओर नाराज हात. आदीस ती तॅँआ मनातनॅ उतारले आन आतॅ तॅ बग्या नाका. आतॅ तॅँआ दोगीआ आंगाला भॉँबडॉ लागलॅ हायदॅ. आतॅ त्यो दोगी तीॲ अहॅ हाल करदयात ना तॅ माला बगव्याशॅ नात भगून मॅ जास्ती विसरात पडलॅ, आन बी तुला हांगीला ताहा अही नावळ जर लागली तॅ मॅ तॅँॲ वराडे आन हनपाळने तन करनॅ कॉहॉ या विसाराय माई आत्तॅस नीज उडाले.' बिशानॅ इशादरी मन मॉकळा केल्योर तॅला थॉडा बरा वाट्या लागला. इशा तॅव हाथ हाथात घॅत बोयलो,'बिशा मॅ तूऑ एक खांद जरा हळकॉ करतॅ, तुई तिहरी पोरी माआ मिनशा बाबूला केली. बास ! आजपासून आपुन वॅइ वॅइ'. आहा बॉलॉन इशानॅ बिशाला वॅँग मारली. पन बिशाऑ कय विश्वास बॅहात नॉतॉ. तॅनॅ विसारला, 'इशा ! तु खरास बॉलाता गा समजूत काड्यापुरता माई शेष्टा करता?'

'मा गळ्याई हप्पत! बास !' आहा बॉलॉन तॅनॅ गळॅतशी मावली ई पय तॉँडापा निली. तिगाळा बिशाला विस्वास ठॉयास लागलॉ. तरी तॉ हांग्या लागलॉ, 'बग इशा, तू नंतर सब्द फिरवॅसॉ नाय ना ?'

‘आरॅ गॅल्या शाळीस वहराई आपली दोस्ती हाय ना. आतॅपोत या इशानॅ कतॅ दिलॅलॉ सब्द फिरविलॅ गा? मंग तुला शंका कदो येतॅ..? इशा ताड्‌कन बोयलॉ.

‘ताहा नाय रॅ इशा, पन तुई पायरी, माई पायरी. जरा फरक हाय ना. तूआ घराना शिरमंत आन मॅ पडलॉ.... ‘ बिशाला मिन्नॅस अडवॉन इशा बोयलॉ,’पायरी बियरी गेली उडात. ता मॅ कय मानी नाय. गरीब शिरमंत तू मानता हायदा तॅ आपलॅत एक बॉलना हाय ता मायती हाय ना, ’लेक द्याशी शिरमंता घारा आन ऑबाय करॅशी गरिबा घरशी.’ ताहा समाज.

इशानॅ ऑडा बॉलता खोटी बिशानॅ इशाला जॉक्कॉन वॅँग मारली. ती वॅँग होडवीत इशा बोयलॉ, ‘ओड्योर नाय भागॅसा.
नाता करॅदो ताता फॉड्या लागॅदॅ आन नवटाक नवटाक घॅआ लागॅदॅ. तॅआबिना हयरा काहा जकॅदॅ?’

‘आरॅ सल गनी. बिशा गरीब अहलॉ तरी तात्याला आन नवटाकाला घाबारलॅ गा का ? आन आतॅ इशाहारकॉ मालदार वॅई असताना ?’ आहा बॉलॉन दोगे नेहमीशा अड्‌ड्योर गेले. तडॅ ताते बाफिता बॅताम वखत जालॉ. आज दॉगाई दोन दोन शाव्ने वदार / घने मारले.

दॉपार डोख्योर आल्ती. जक्ले जीऑन ओट्योर माशीत नातॅ हिंदाळ्यात आराम करतोते. ऑडॅत इशा बिशाई जोडी हालात डूलात येताना जकल्याई बगीली आन जकल्याना बॉठ्ठा नवालूस वाटला. जकल्यांना तॅँइ दोस्ती माइत होती पन आहा कतॅ बगीला नॉता. तॅँना कडॅ माइत हाय, आज दोस्तीत हयरा जक्लॅ ता...!

# तू मिळालोस्ती तॅ – कॅरल डिकोस्टा, गास

अॅका परिकशेई तयारी करताना मॉबाईलवरनॅ जॉनशी ओळख अॅका पोरी हरी जाली. अस्तॅ अस्तॅ मैत्री ओडी वाडली गा जॉन तिला जवळशी मैत्रिन मानतॉतॉ. तॅनॅ दी भरात का का कॅला ता आख्खा तिला हांगॅसॉ. तीनॅ का कॅला ता वीसरॅसॉ. ती पन तॅआ हरी बरास बॉलॅशी. ती तॅआ मॅरशा गावात रॅतोती. जॉन आख्खालॉ दी तीआ हरी बॉलात बॅहॅसॉ. ती तॅला जामूस आवड्या लागलोती. तॉ हमी हमी तीआ हरी फोनवर बॉलॅसॉ. तिला पन आतॅ नाख्खॉडा जानव्या लाग्लोता. कारन तॉ वागातोतॉस तहॉ. एक दी तॅनॅ तिला भॅट्या बोलविला. तीआ करता ऑ नवीनुस माहनू हॉतॉ भगून ती गेली तिला तॉ खुब बरॉ माहनू वाटलॉ. आन खरास जॉन सॉभावानॅ हॉतॉ पन तॉहॉस. जॉननॅ तिला हांगॉन ठविलता, ‘तुला जॅ कतॅ अॅखादॉ शरीराऑ किडनी हारकॉ अॅखादॉ भाग लागलॉस तॅ तॉ मॅ देनॅ.’ ऑडॉ तॉ तीओर प्रेम कऱ्या लागलॉतॉ. अहा करता करता तॅँआ मैत्रीए पास वहरे भरले.

जॉन तिला हमी खुश ठवॅसॉ आन तॉडॉस तिला घाबरॅसॉ पन. पास वहरात ती तॅला किती वॅळा भेटली, तीआ तीऑ वाड दी, तीआ घरश्यांव वाड दी अहा जक्ला कय तॅनॅ लिऑन ठविलता. तॅआ मनाहारका ती नाय वागली गा ऑ जाम रागवॅसॉ पन तिला तॅऑ कय फरक पडात नॉतॉ. जॉन तीआ हरी जाम जाम बॉलॅसॉ, एकदा तीनॅ तॅला हांगीला मा हरी बॉलॅसा बन कर. पन तॉ कय आयकात नॉतॉ. लगीन करनार तॅ यास पोरीआ हरी आहा तॅनॅ ठरविलता. ताहा तॅनॅ तॅआ अॅका मित्राला तीआ बद्दल जक्ला हांगिलता. तिगाळास तॅआ मित्रानॅ, ‘तू ऑ जक्लॉ विसार मनातनॅ काड आन अब्ब्यासाओर बग’ आहा हांगॉन चूप कॅल्ता. पन जॉनला कय कॅल्या रॅवात नॉता. तॉ फोनमीनश्यो शायरी शॉदॉन तिला धाडॅसॉ. तॉ तॅव अब्ब्यास बाहॉन गेल्तॉ.

जॉन तॅ तिला बॅतान कय हांग्योवता पन तॉ हांगू शकात नॉतॉ. भगून तॅनॅ ता शारपास जागी ता लीऑन काड्लोता. जॉन तॅआ पोरी करतान वॅडॉ जाल्तॉ. तॅला तीआशिवाय रॅवात नॉता. आन तॅआ बनॅ अब्ब्यासु हॉत नॉतॉ याव घाबरॉ पन हॉतॉ. इ जक्ला सुरू असतानास एकदी तॅआ पोरीआ हैरा जालॅइ बातमी आली. आन हैरा जाला ता पन नॅम्का जॉनशास गावात. जॉन तीआ करतान खुश जालॉ पन सॉता करता तॅआ मन रंजी जाला. ती तीआ हाऱ्या या लागली आन अडॅ माआस गावात माइ आन तीइ भॅट कही हॉयदॅ ऑ जॉन विसार करतॉतॉ. मंग तीआ हैऱ्या दुख मनात ठवॉन तॅनॅ माकून अब्ब्यासाला सुरवात केली परीक्षा तन दिली. आन तॉ तॅआ कामाला लागलॉ.

# आमंत्रण ! - सिरील मिनेझीस, आगाशी

एक जवळसॉ मित्र घारा आलॉ आमंत्रण करॅदो. तॅआ पॉराआ वराड हॉता. आपला आमंत्रण फिक्स हॉता. तॅनॅ कंकोत्री दिली, आन हांगीला आपलॉ प्रोग्राम हीनवारॅ हांसॉ हाय. यासा. तॉ गेल्योर मॅ कंकोत्री बगिली, त्योर लीविलता आयतवारॅ दॉपारसॉ प्रोग्राम हाय भगून. आतॅ माला प्रश्न पडलॉ, माला हीनवारॅ आमंत्रन दिलॅ (कादो ता तुमशा ध्यानात आलॅ हायदॅस) आन पत्रिका दिले, त्योर आयत्वारसा आमंत्रन हाय.

आपलॉ जूनॉ काळ आठवालॉ गा तुमशा ध्यानात येदे गा तॅआ काळशा आमंत्रनात आन आजशा आमंत्रनात जमीन आस्मानाऑ फरक हाय. तिगाळशा काळात आपल्यो बयो मटन बनव्याश्यो पन तॅआ मटन कतॅस बॅकार हॉअॅसा नाय, पन आतॅशा कॅटरसला कुनुस अव्वाल जीवान कॅलॅ आहा बॉलॅ नाय. तहास या आमंत्रना हाय. तिगाळा एकेका घारा तीन तीन आमंत्रन पॉशॅशे. एक वरमायसा, दुहरा पॉरा नातॅ पोरीआ आन तिहरा गावकऱ्या. आमंत्रनाला पन तीन मन वजान अहयासा. आतॅ काळ बदाललॉ आन आमंत्रनाइ पद्दत करोनानॅ पार बदलली. आमसॉ एक मित्र हाय तॅआ दारा पूडनॅ आमंत्रन करनारॉ गॅलॉ तरी तॉ तॅआ वराडाला जासॉ. कुनॅ विसारला तॅ तॉ हांगॅसॉ, 'तॉ माआ दापुडनॅ गॅलतॉ'... असो....

आतॅ कोरोना निमतान आमंत्रनाइ पद्दत आपसूक बदलली. लिमिटेड पन्नास माहने ठरले, गावकरी भाहाले. बचतुस बचत ! आन आमंत्रनाइ पद्दत पन का ? “लग्नाला यासा हा. आमसॉ हिन्वारॅस प्रोग्राम हाय, फेरी मार.” आतॅ मॅ फेरी मारॅदो, कय सायकली ऑ विक्रम कऱ्या लागलॅ गा का ? तुमॅ करोना निमित करॉन जॉ आटोपशीर प्रोग्राम करॅ लावीलॅ ता ठीक हाय, पन आमंत्रन जरा हारका करा गनाय. तुमसॉ प्रोग्राम लानॉ हाय तॅ ताहा तुमॅ स्पष्ट हांगा गनी.... “माऑ प्रोग्राम लानॉ हाय भगून तुआ ॲकलॅलास आमंत्रन हाय” आहा स्पष्ट हांगा. कुनालास राग यासॉ नाय. नीट आमंत्रन होये नाय भगून लोक येत नाय आन मंग आजकाल कानोर पडातॅ गा अमुका घारा सैपाक रॅलॉ. जहे आमंत्रन करनारे सुकातॅत तहेस आमंत्रन घॅनारे पन सुकातॅत. या बाबतीत मॅ वाडवळ समाजाला बॅताम मानतॅ. तॅंना तुमी आमंत्रन करॅ जा, तॅआ भावकीत जॅ वराड हायदॅ तॅ ते स्पष्ट हांगातॅत, ‘ओय मी तुआ घरा वराडाला यासा नय, आमशा बायशा मॅरॅ पन वराड हाय.’ आहा स्पष्ट हांगनारा माहनू ते हिशोबात धरीत नात. पन आपल्या कुपारी समाजात, ॲखाद्या घारा जरी वराड हायदॅ तरी तॉ हांगातॅ, ‘मॅ फेरी मारनॅ.’ आहा खॉटा आश्वासन देते आन तास नडाते अन्नाई नासाडी हॉया.

मंडळी... कोरोनामुळॅ अगदी कमी पै-पाव्ने घॅऑन लगीन सॉहळॅ जालॅ. आजपन कय ठिकानी हॉतॅत, इ आनंदायी गोष्ट हाय. पन आमंत्रन करताना स्पष्ट आमंत्रन करा. तुमाला ॲकालास आमंत्रन करॅसा हायदॅ तॅ ताहा स्पष्ट हांगा. कुनालास राग यासॉ नाय. जुन्या काळात आमंत्रनाला कोडी आपुलकी होती पन ती आतॅ रेली नाय. माहने शिक्षित जाले, पन मानूसकी नाय बदालली. काळ बदाललॉ, वेळ बदालली. जुन्या माहना दरनॅ लग्नाव सैपाक बनव्याशी कला आपुन नाय घेट्ली भगून आतॅ कॅटरस श्योद्या लागातॅत. आत्याशा रोटयांना तिगाळशा हारकी सव नाय, कारन बनावनारॅआ तॅआ बय दरनॅ आपुन रोटयाव फार्मुलॉ घॅटलॉस नाय. ताहास या आमंत्रनाआ हाय. आमंत्रन काहा करॅसा इ आपुन समजॉनुस घॅटला नाय. मंग का हॉनार ? एक तॅ लोक कमी येनार आन सैपाक रॅनार नातॅ लोक घना येनार आन सैपाक खुटनार.

आतॅ आपल्या कंकोत्री मिनशी एक ओळ कमी केली पाय... “वरील विनंतीस मान देऊन सह कुटुंब, सह परिवार येण्याची कृपा करावी.”

# सरीखाल - प्रेम आल्मेडा, निर्मळ

आरॅ इना ! आतॅ बी जागा कादो घे.? तडॅ जाय कुन.? भुते निंगातॅत तडे.. इनाला जक्ले तॅतार करोतोते. पन इना हांगातॅ, ‘होंदे ना पॉरापारांना लागु हॉयदॅ. तॅनॅ कुना आयकीलास नाय.... कळंबा खाडीनजीक तॅआ वाडीला लागॉनुस बीई एक वाडी घेटली. अँगनॅ वरशा आंगाला सार रुजॅशी आन खालशा बाजूनॅ कळंबाई खाडी. नवाळॅतनॅ तडे सार काप्यादो जाशे. सारीआ खालशा आंगाला वाडी होती. बॉल्ता बॉल्ता भाटाआ नाव पडला ‘सरीखाल.’ कून कून दालमेतसा भाट पन बॉलॅशे. तॅ भिगावसा लोक दापळॅ बॉलॅशे. इंबळा जूनॅआ दॅवळाआ नावोरनॅ फादरनॅ पुडॅ नाव ठविला “सांताक्रूझ”.



अहॅस दी भरातोतॅ.. जक्ला बरा सल्लॉता.. पन तॉ ओशिक पडलॉ पिलेग आलॉ गा आन जकलॅअॅ फॅरॅ फिरलॅ. १८९६ सा वहरी ता. जॉ तॉ घाबरलॉतॉ... गावामीनॅ आतॅ रॅअॅसा काहा.. कुन राटोर तॅ कुन हिवारात जाऑन रेले. नवाळशा दालमेत कुटूमात इना जकलॅत बॉठॅ. तॉ आन तॅऑ बाहा इंबळा जुन्या दॅवळा मांगशा सरीखालशा भाटात रॅदो गेले. हळूहळू सार कमी केली आन भाट कहॅदो घॅटला. पिलेग कमी जालॉ, तहे लोक गावात परत या लागले. इनाअॅ बाहा पन गॅलॅ. पन इना मन मात्र कय सलॅ नाय. दरॅआ बुडसा वारा येतोता. भाटामिनॅ लागवड केल्ती. कुना एक नाय गा दोन नाय. इना तडेस रॅलॉ. इनाय तीनु पॉर जॅक, सिमाव आन जॉकी तडॅस वराडलॅ. तॅतसॉ एक पॉर मॅलॉ... का जाला कुना गाइ..? तॅतॅ कय जाला नॉता.. थॉडॅआ दिहान इना पन तडेस मॅरॅ जुन्या दॅवळा पॉस्लॉ.

आतॅ असनी बोठ्ठी २५-३० एकराई वाडी आन अॅकलासा अॅकला घर. घरामीनॅ दोन वर्ग. शिमा मुंबय पन जासॉ. आन तडनॅ पराडॅ, जाते आहा जक्ला सामान हाडॉन विकॅसॉ. मुंबयला

कुहनीतरी बँक पडलोती तॅय दगडी खाम रेलीत टाकॉन नाळाहॉपारॅत उतरविलॅ. तडनॅ गाडॅत घालॉन घारा हाडलॅ. तॅऑ घराआ दापुडॅ माळॉ बांदीलॉ. घर बेताम बॉठ्ठा पन घरामीनॅ शिमा आन जाकी दोगूस गव. दोगायो बायको आन पोरे.. डोकरी बय आन काकय.. पन शिमा आन जाकी मिंजॅ कहॅ गव.. ॲ भल्लॅ बॉठ्ठं कुनाला घाबरॉन नॉतॅ. जाकी आडुॅ जॅ लागलॉ तॅ कुनाला आवरॅसॉ नाय. आन तॅआ तॉँडाला नुस्ती गाळ. ऑडॉ कुटूम आन करतॅ गव दोगीस. वाडीमीनॅ कडसा कुन पन लोक यासा... नाळ पाडॅदो, केळीए बन्ने वाळॅदो यासा. ताहास नाळ सॉरॅदो, आंबॅ टुक्यादो, लोंगरे सॉरॅदो पन यासा. वारली-फुद्र्डी कामाला याशे. बारक्यो सारक्यो सोऱ्यो सलॅश्योस.

ईतूर काकाआ तॉमानॅ इंबळोरती घर बांदीलता पन तॉ कतॅ कतॅ भाटात रॅदो यासॉ. तॅआ पन आरनामिनॅ बावखालाआ पूडॅ जुना घर हॉता. तॉ तडे ॲकटॉस रॅसॉ. तहॅ एकदा रातशॅ सोर आलॅ. तॉमाला आवाज आलॉ. तॉ मिंगारनॅ खाडीत उतरॉन धावात धावात शिमा आन जाकीआ घारा गॅलॉ. तहॅ तॅ दोगू दांडॅ घिती धावलॅ पन तोपोत सोर पसार जाल्तॅ. घरातशे भांडे, कुदळ आन तॉमा काकाआ कब्ज्यात पैशॅ हॉतॅ तॅ घॅऑन पळालते.

मंग या सॉराई हिम्मत वाडली. एकदा नाय गा दरॉडॉ टाक्या आलॅ. आतॅ का करॅसा. आवाज आयकॉन सब्बान कुटूम जागा जाल्ता. बायको पोरे रड्या लागले. सोर दरवाजॉ फॉडॉन आतलॅँगा आलॅ तॅ का करॅसा.. बार टोळी बोठ्ठी दिखातॅ. शिमा आन जाकी विसारात पडलॅ. नवाळॅत निरोप तरी कडनॅ धाडॅसॉ.. एक हाक मारली तरी आख्खा भावबंद धाऑन आलोस्ता. बास. यास विसारोरनॅ यांना नक्काल सुसली. दोगाई जॉर जॉरात आड्ड्याआ सुरवात केली आन घरात अडशॅ तडे धावॅआ लागलॅ आन जकल्याय नावे घ्या सुरवात केली. ‘काळ्या तू राटोरनॅ धाव, मॅ अडनॅ कुराड घिती आलॅ. धुज्या तू कोयतॉ घिती फुना झाडामांगनॅ धाव. फरशा, मिंगू, दुमा..... तुमी तडनॅ पूडनॅ धावा. आज ॲ हॉडॅशॅ नात. बरॅ फटाऑ. बांदोन ठॉऑ. यांना का वाटला आडे कुन नाय....

इ आयकॉन सोर गांगारलॅ. ओडी मंडळी कडशी आली. आतॅ कय आपली बरॅई बाजू नाय. या हाथा हापडलॅ तॅ मार खा लागॅदॅ. एक तॅ तडे नुसता जंगाल. काटॅ, काळोककीट तॅत बी हांगातॅत भुते निंगातॅत. सोर जाम घाबारलॅ आन जक्लॅ पळालॅ. दालमेतकरां अस्साल हुशारीपुडॅ सॉराई का ती बिशाद. ततपासून रातसा तडे कुन बगुन आला नाय.

# वसयसॉ कुपारी - बॅप्टिस्ट वाझ, गोम्सआळी

वसय तालुका ऑ सागर, आगर, नागर आन डोंगर यामिनॅ विभागलॉ गॅलॅ. वसयला दक्षिनपासून लागला तॅ उत्तर दिशापोत बॉठ्ठॉ किनारॉ मिळालॅ. ३११ किलोमीटर परिसरात पसारलॅल्या वसयमीनॅ समावेदी बामन, कुपारी, वाडवळ (ख्रिस्ती-पानमाळी), कोळी, भंडारी आन ईस्ट इंडियन लोक रॅतॅत. वसयश्या कुपाऱ्यांना जाम बॉठ्ठॉ इतिहास हाय. वहरा भाशेत हांगॅसा तॅ जवळपास पास-सशे वहराव इतिहास हाय. मूळ समावेदी बामन समाजातनॅ वायलॉ जालॅलॉ समाज मिंजॅ कुपारी ख्रिस्ती समाज. तॉ वायलॉ कदो आन कॉहॉ जालॉ ऑ एक वायलॉस विशय हाय आन त्याबाबतीत वायल्यो वायल्यो कान्यो हात. तरीपन बामन आन कुपारी याई भाशा, संस्कृती, सालीरीती थॉड्याफार परमानात हारक्योस हात. काळ बदलात गॅलॉ आन शिक्षान आन बारश्या देशाई संस्कृती-पॉशाक याव परीनाम यामुळे कुपारी आन बामन या दोन समाजाआ खानॅपॅनॅत राअनीमानात बॅताम फरक पडलॉ.

सादारन ५०० वहरा आदी पोर्तुगीज लोक भारतात आले आन तॅइ क्रिस्ती धर्माऑ प्रसार कॅलॉ. तिगाळा भारताशा किनाऱ्योर रॅनारॅ कय लोक क्रिस्ती जाले. पायलॅंदा पोर्तुगीजानॅ क्रिस्ती लॉकां शिकशानाओर लक्ष दिल नाय तॅ निखाळा धर्म शिकशान द्यासा काम कॅला. तॅना जाम श्रद्दाळु बनविला. फादर आन बायबलश्या हिकवीनॅऑ परिनाम हॉवॉन तॅ सादॅ, भॉळॅ, समंजस, शांतीप्रिय आन इमानी बनलॅ. पुडॅ इंग्रज भारतात आलॅ तॅई शिकश्नाव परसार कॅलॉ. याबाबतीत आपल्यो क्रिस्ती संस्था पन मागॅ रेल्यो नाय. तॅई पन ‘चर्च तडे शाळा’ आहा धोरन ठविला आन तिगाळ पासून क्रिस्ती लॉंकां खऱ्या प्रगतीला सुरवात जाली. तिगाळा कय चर्चशा दरी जागा होती तॅ शाळीकरता बिल्डिंग नोती. दरी पैशॅ नॉतॅ. पॅरिशसा लोक गरीब. पन तिगाळशॅ गॉयानीस फादर मुंबयला गॅलॅ. कय लॉकांना भॅटलॅ. तॅआ दरनॅ पै-पै मिळाली ती गॉळा केली. गावशा लॉकांई मेहनत केली. शाळा ऊबी केली. आतॅ शाळीत हिकॅदो पोरे कडशे हाडॅशे.? मंग फादरनॅ पॅरिशसा हिकलॅल्या लॉकांना हाथा घॅटला. तॅई गावात दारोदार फिरॉन पोरे गॉळा केले. तॅंना आब्यासाई गोडी लाईली आन अस्ते अस्ते गाडी रुळोर आली.

मंग कुपारी लॉकांई मागॅ वळॉन बगीला नाय. अशिकशीत बयबाबाला सुदा शिकशना महत्व कळाला. तॅई पॉटाला शिमटॉ काडॉन पॉरांना हिकविला. पोरे हिकले. बोठ्ठे जाले. कामाला लागले. हाथा पैसॉ या लागलॉ. मंग याई तॅंआ पॉरांना कॉन्व्हेंट शाळीत घायला. तॅआ करता हिकवनी ठविली. ये पोरे तॅ आपल्या आयबापापेकशा हुश्शार निगाले. कून डाक्टर, कून इंजिनियर, वकील जालॅ. तॅ कून सीए जालॅ. पत्रकार-लेखक जालॅ. शित्रकार जालॅ. IAS आन IPS हांगडा होडला तॅ बाकी परतेक ठिकानी कुपारी पॉसले नात आहा जाला नाय. शिकशना बाबत इतर समाजाला मागॅ टाकॉन कुपारी समाज बॅताम पुडॅ निगॉन गॅलॉ. नंतर नंतर तॅ शिकशान घॅआ बार दॅशात पन

गेले. तडे वरसा शिकशान करॉन तडॅस रॅलॅ. नुसतॅ पॉर नाय तॅ पोऱ्यो पन बार दॅशात शिकशान घ्या जा लागलॅत. जगाआ पाठीओर अहो देश नाय जडे कुपारी नाय. समाजात न हांगता यासॉ ऑडॉ बदल जालॉ. बयबाबाइ कमाऑन बांदलेले भोट्भोटे घरे आतॅ ओस पडॅआ लागले. अस्ना बॉठ्ठा घरात डॉकरॅ-डोकरीस रॅआ लागले आन घर तॅना खा लागला.

दुखाई बाब मिंजॅ हुशार पोरे बार दॅशात जा लागलॅबनी आन तॅत घरात एकुस पोर नातॅ पोरी याबनी उत्तर वसयशा कुपारी समाजाई लोकसंख्या दिहोनदी कमी हॉव्या लागले. तॉ दी लाम नाय गा कुपाऱ्याई गत पारशी समाजागत हॉऑन आपल्या वाडवडलाई बांदलॅलॅ बंगलॅ ओस पडॉन रॅनार नंतर परप्रांतातनॅ आलेला लोक आपली जमीन कहीता कहीता बंगलॅत पन रॅआ लागॅद्यात. पन तॅआहून बॉठ्ठॉ परिश्न अहॉ हाय गा डॉकरॉ-डोकरी हांबाळ कुनॅ करॅसॉ.? डोख्योर छप्पर, घरात सोईसुविदा, खिशात पैशॅ हात पन आंगा दुखनॅखूपनॅला जवळसॉ माहनू लाम बार दॅशात ! मंग का करेसा..? उपाय एकुस नाईलाजानॅ धाडॅशे हांगा गा ठवॅशे हांगा डॉकरॉडोकरी वृद्धाश्रमात. कैक वहरान वृद्धाश्रमात पन जागा मिळदॅ गा नाय ई पन हांगता यासा नाय.

मंग योर उपाय एकुस समोर येतॅ तॉ मिंजॅ पयल्यान ‘चर्च तडे शाळा’ यानुसार आतॅ “चर्च तडे वृद्धाश्रम” इस धोरन राबव्या लागॅदॅ. उत्तर वसयश्या निर्मळ, नंदाखाल, आगाशी आन बोळींज हारक्या पॅरिशमिनॅ वृद्धाश्रम सालू कऱ्या लागॅद्यात. ई शित्र आतॅ जरी ‘ई जरा जास्तीस जाला’ आहा वाटात अहला तरी ॲनाऱ्या काळाई ती गरज हाय. आत्तॅश्या वरिष्ठ मंडळीनॅ मना ई तयारी करॉन ठव्या पाय. पुडॅ ॲनारॉ काळ आन त्यामुळॅ हॉनारी परिस्थिति कठीण हॉनार हाय. तॅला इच्छा अहो गा नहो पन तॉँड दॅना भाग हाय. पन धीर हॉडॉ नाका. संत तुकारामनॅ हांगील्या परमानॅ –

आलिया भोगासी असावे सादर
देवावरी भर घालूनिया
तोची कृपासिंधू निवारी साकडे
येरे बापुडे काय रंक

बी आपल्या हाथा कईस रॅनार नाय. नुसतॉ देवोर विस्वास ठॉॲसॉ. कारन तॉस आपला संकट दूर करनार हाय. आपला तारन करनार हाय.

# “फाटला नाय ता तांबडा लुगडा“ - सौ. हेडविजेस रुमाव, गास

हाकोटे देवळाशी घारा आली आन ओट्योर सडातॅ बास तव दुमी बयला मांगनॅ हाक आली. मॅरशी कती काकय धाहात आली आन हांगातॅ, ‘बय जरा माआ घारा डॉकाव सल ना..’ दुमी बय विसारतॅ, ‘कला, का जालॅ...? ओडी घामाघूम कदो जाल्या..? पोरीला काय बरा-बिरा करी नाय गा का ? मॅ थॉड्या वॅळानॅ आंग धॉया यॅस गनाय, मंग तू आतॅस ओडी धाहाधाहात आली ती..?’

कती काकयशी पोरी बाळांत जालती, तीइ पोरी मयन्या भराई जाले. दुमी बय रॉज तीआ मालीश आन आंग धॉया जातोती. तिला बारक्या पॉरां कय दुखला खुपला गा का करॅसा याव जाम अनुबव हॉतॉ. कती काकय हांगातॅ, ‘माला धीर नाय आहा नाय ला पन पोरीनॅ हप्प्या रात जागॉन काडले, निजेस नाय ना. माला कय हुमजॅस नाय का करॅसा ता. बेबी बोयली, ‘आत्तॅशॅ आत्तॅ बय ला बोलव, भगून / तॅतॅन मॅ आली ला. तू सल, शा तन माआ घारा पे सल..’ दुमी बयनॅ घरा आतमीनॅ डॉकाइत खॉयार खाट्योर ठविला आन बाबाला बोयली, ‘मॅ पटकान कतीआ घारा जाऑन येतॅ.

कतीआ घारा बय पोसली आन दारातनॅस हांगातॅ, ‘बेबे कय धास्ती करॉ नाका थांब.’ आन मिंगारा हातपाय धव्या गेली. हात पुहीत आतमीनॅ आली आन बगीतॅ तॅ बेबीअॅ डॉळॅ हुजल्यात. मंग तीनॅ बारक्या पोरीला घॅटला, जकल्या बाजूनॅ हारका बगीला. हातपाय खाला-वर कॅलॅ, पॉट दाबॉन बगीला तॅ पॉट कडाक जाल्या हारका वाटला. मंग तिनॅ विसारला, ‘आख्ख्या रातीत पोरी हगिलती किती वॅळा आन मुतीलती किती वॅळा... पॉट भरला रॅलॅ.’ तॅ बेबी बोयली, ‘आज रातीत कय ऑला कॅलास नाय.’ मिंगॅ बय नॅ एक तांबड्या लुगड्याऑ हुडकॉ घॅटलॉ, सुलीओर लोडी गराम केली. त्योर हुडकॉ गिरमातॉ कॅलॉ आन पोरीआ पॉटाला हेक कॅलॉ. समशी भर जिरा भुजीला आन तॅव पानी करोन दोन समश्यो पाजील्यो.

पास-दा मिनटात पॉट साफ जाला आन थॉडॅआ वॅळानॅ पोरी निजली. बयनॅ दोन जुने तांबडे लुगडे फाडॉन हुडकॅ करॉन दिलते पोरीआ आंगाखाला आथरॅदो. तांबड्या लुगड्यात लान्या पॉरांना गॉमारला गा तॅआमिनॅ पॉरांना गिरमा बरी मिळातॅ. एकपरकारसॉ आदार मिळातॅ. तांबड्या लुगड्याव रंग उतरातॅ पन ता फाटॅ कतॅस नाय. बेबीनॅ बयसॉ फोटो बगीलतॉ तॅ, बेबी बोयली, ‘बयशा पॉरा लग्नात बय तांबड्या

लुगड्यात सॉबातॅ.’ इ आयकॉन बय बोयली, ‘इ तांबडा लुगडा, तांबडी सोळी, गळ्यात तांबडा पोवळ्यो, हॉनॅत बांदिलॅला हिरान, कानात वाळयो अहॉ आमसॉ पॉशाक कॅलॉ गा आमाला पावडर लाली लाव्याशी गरजूस नाय. आमश्या तोंडोर आपसूक तॅज येतॅ.’ तांबड्या लुगड्याऑ पदर, कानो आन मांगनॅ कहाटॉ आन नि-याो आहा जकला सापॉनसॉपॉन नीट अहला गा बायको आपोआप बांदल्या आंगायो दिखातॅत. कामे करताना कय अडसन ये नाय. लुगड्याव रंग एकुस तांबडॉ अहल्यामूळॅ एक लुगडा कॉडा वापरला ता कय हुमजात नॉता. एकदा धुईला गा लवकर हुकात पन नोते भगून बो दिहोर धव्या लागेशे. दरी बी घने लुगडे नहॅशे, दोन नवे दोन जुने. नवे बी कुनापा नहले तॅ एकमेकीए नॅहॅशे. कुना घारा जासा हायदॅ, दॅवळा-रावळा, बजार-हजार करॅ तॅ तॅआ एकास लुगड्यात फिरातोते. त्या काळात जकलेस तांबडा लुगडा, तांबडी सोळी एकसाथ कहे वाटातोते हायदॅ. लुगडा पन मांडीओर खॉशासा. आतॅ मुद्दाम फॅशन कऱ्या करतान हारक्या कलरशे कपडे करतॅत.

पोरे भोठे जाले मिंजॅस बयबाबा श्प्पल पॉरां पायात या लागला हा हुमजॅसा आतॅ पॉरांआ आयक्या लागॅसा. पॉरांना कय हांगॉन ते कय आपला आयकनार नाय. आयबाप पन हांगातॅत ते बऱ्या करतानूस. कतॅ ते शिडातॅत ता हुमजॉन घॅसा. एक म्हण हाय ‘आयसॉ राग मिंजॅ पानॅऑ डाग’ पानॅव डाग जहॉ थॉडॅआ वॅळानॅ हुकातॅ, तहॉस तॅनसॉ राग शांत हॉतॅ. भगून पॉरांई बयबाबाला समजॉन घ्यासा. पूर्वीशी वेळ रेले नाय. कुना एक पूत आन एक बाय ओडेस पोरे हात. आन आतॅआ काळात कून कडॅ जायदॅ, नाते कडॅ तुटेद्यात, कून कुनाला बाहॅदॅ ता कय हांगता यासा नाय. खरा हांगॅसा तॅ कुनाला तॅआ कय पडला पन नाय. आपलॉ कुपारी समाज मिंजॅ भारत दॅशात एक जुरूकसॉ बिंदु हाय. ये बिंदु दॅशात-बार दॅशात बऱ्यापैकी फॉकल्यात. पन तॉ माळीआ दॉरा घतीन जडतड्ने बांदलॅलॉ हाय. ॲकमॅकांना भॅट्ना हॉतॅ इस बोठी दॅवाई देनगी हाय. आपलॉ पॉशाक आन आपली भाशा टिकव्यादो झटतॉ हाय. तॅआ परयतनाला यश येउन्दे आन कुपारॅओ एकमेकोर जीवाळॉ वाडुंदे याकरता ब्येस.